# प्रास्ताविक भूमिका

" उत्कट भव्य तेचि घ्यावे । मिळमळीत अवघेचि टाकावे।
निःस्पृहपणे विख्यात व्हावे। भू मंडळी ।। "

हे वचन आठवताच समर्थ रामदासस्वामींची मूर्ती डोळ्यासमोर उभी राहते. समर्थांची अनेक वचने आपण नेहमी ऐकत असतो. आपली भारतभूमी ही अनेक नररत्नांची खाण आहे. राजकारण, विज्ञान, अध्यात्म, साहित्य अशा विविध क्षेत्रात अनेक थोर व्यक्ति, विचारवंत, होऊन गेल्या आहेत. तसेच आपली संतपरंपरा ही विशाल आहे. संतसाहित्यही विपूल आहे. वैदिक वाङ्.मय, उपनिषदे, श्रीमद्भगवतगीता, रामायण, महाभारत यासारखे श्रेष्ठ ग्रंथही आपल्या साहित्यात अमर झाले आहेत. अध्यात्मिक उन्नतीचे अनेक मार्ग त्यामधून सांगितले आहेत. तसेच जीवनाच्या विविध क्षेत्रांची ओळख करुन दिली आहे. प्राचीन संतकवी, त्यांची ग्रंथसंपदा विविध संप्रदाय असे आपल्या अध्यात्मिक क्षेत्राचे स्वरुप आहे. नाथसंप्रदाय, महानुभाव, दत्तसंप्रदाय वारकरी आणि समर्थ संप्रदाय हे पाच संप्रदाय त्यामध्ये प्रामुख्याने उठून दिसतात. समर्थ संप्रदायाची स्थापना श्रीसमर्थ रामदासस्वामींनी केली आहे.

बी. ए. आणि एम्. ए. च्या अध्ययनावेळी प्राचीन संतसाहित्याचा परिचय झाला. त्यामध्ये समर्थ साहित्याचा अधिक विस्तृत, विवेचक अभ्यास करावा अशी इच्छा निर्माण झाली. माझे मार्गदर्शक डॉ. दा. वि. कुलकर्णी यांनी या इच्छेला प्रेरणा दिली. संतसाहित्याची गोडी आमच्या मनामध्ये निर्माण होण्याचे सारे श्रेय मी त्यांनाच देते. डॉ. कुलकर्णी आणि त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. अनुराधा कुलकर्णी हे उभयता संतसाहित्याचे गाढे व्यासंगी आहेत. संतसाहित्याच्या क्षेत्रात त्यांना अत्यंत आदरणीय असे

स्थान आहे. त्यांचे अत्यंत मौल्यवान असे मार्गदर्शन मला लाभले आहे. गुरुवर्य डॉ. दा. वि. कुलकर्णी यांच्या अनमोल मार्गदर्शनामुळेच मी हे काम पूर्ण करु शकले आहे.

समर्थ साहित्यावर आजपर्यंत खूप संशोधन झाले आहे. समर्थांचा जीवनकाल इ.स. १६०८ ते १६८१ असा आहे. त्यानंतर आजपर्यंतच्या ३०० वर्षात समर्थ साहित्यावर अनेक विद्वज्जनांनी विपूल असे साहित्यसंशोधन केले आहे. त्यामध्ये सर्वश्री शं. कृ. देव, श्री. शं. दा. पेंडसे, श्री. न. र. फाटक, श्री. स. खं. आळतेकर, श्री. श्री. म. माटे, श्री. गं. बा. सरदार, श्री. भा. श्री. परांजपे, श्री. प्रभाकर पुजारी, श्री. त्र्यं. वि. सरदेशमुख, डॉ. उषा जोशी या प्रभृतींचा समावेश होतो. या सर्वांच्या साहित्याचे मार्गदर्शन घेऊन मी माझ्या मर्यादेप्रमाणे हा प्रयत्न करणार आहे. या - विद्वज्जनांची सर मला येणे कदापीही शक्य नाही परंतु -

" यत्न तो देव जाणावा । "

या समर्थवचनानुसार मी हा प्रयत्न करणार आहे.

संतसाहित्याचा अभ्यास करताना सर्व संतांपेक्षा समर्थांच्या साहित्यामध्ये एक वेगळेपण जाणवले. एक परखड वाणीचा संतकवी आणि साध्या, सोप्या भाषेत जीवनावश्यक तत्वज्ञान सांगणारा तत्वज्ञ असे दुहेरी व्यक्तिमत्व त्यातून जाणवले. अध्यात्मिक प्रगती करुन घेण्यासाठी घरदार - प्रपंचाचा त्याग करावा लागत नाही. ज्याला प्रपंच नीट करता येत नाही तो परमार्थ काय करणार? असा रोखठोक सवाल ते पुसतात. तसेच त्यांच्या साहित्यामधून राजकारण, अध्यात्म, राजधर्म, सेवकधर्म, सामाजिक परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन, ग्रंथ विज्ञान इ. विषय आढळून येतात.

राजकारणातील युक्ति, सावधपण, आक्रमकता, सडेतोडवृत्ती मनाला विशेष भावली. तसेच त्यांच्यामधील हळवा, संवेदनशील, भावून असा कवी ही जाणवला. ही भावूकवृत्ती आणि राजकारणातील परखड पण सावधवृत्ती दिसून येणाऱ्या "करुणाष्टके आणि आनंदवनभुवन" यांचा चिकित्सक अभ्यास असा विषय मी निवडला आहे.

"करुणाष्टकांमधून" दिसून येणारी समर्थांची करुण मनोवस्था आणि त्याच काव्यातून पाझरणारा करुणरस, भावूक, हळवी वृत्ती, रामभेटीची तळमळ, सामाजिक परिस्थितीची जाणिव, सगुणोपासना साधकाची अंतरस्थिती इत्यादी चा विचार प्रस्तुत प्रबंधात करावयाचा आहे. "करुणाष्टके" ही समर्थांची प्रारंभीची रचना आहे. सुरवातीची १२ वर्षे बालपण, नंतर लग्न-मंडपातून पलायन करून नाशिक-टाकळी येथे गोदाकाठी तप:श्चरण व अध्ययन, सिध्दावस्था प्राप्त झाल्यानंतर आपल्या विद्येचा समाजासाठी उपयोग व्हावा म्हणून देशभ्रमण आणि नंतर महाराष्ट्रात वास्तव्य असा साधारणपणे समर्थांचा जीवनक्रम आहे. ७३ वर्षांचे दीर्घायुष्य समर्थांना लाभले आहे. मधल्या १२ वर्षां-मध्ये नाशिकला गोदावरीकाठी करुणाष्टकांची रचना झाली आहे. वैयक्तिक दु:ख, तळमळ, आर्त मनोवस्था ही सुरवातीच्या करुणाष्टकातून प्रगट झालेली दिसून येते. सामाजिक वास्तवाचे भान असणारी करुणाष्टके ही देशभ्रमंतीनंतर निर्माण झाली असतील असे वाटते. देशभर भ्रमण करताना दिसून येणारी सामाजिक, राजकिय, धार्मिक परिस्थिती या करुणाष्टकातून दिसून येते. करुणाष्टकांचा विचार या पध्दतीने प्रस्तुत प्रबंधिकेत करणार आहे.

सामाजिक वास्तवाचे सूक्ष्म अवलोकन करणाऱ्या समर्थांना राजकारणाचेही सतत भान होते, हे "आनंदवनभुवन" या ५९ श्लोकी प्रकरणातून दिसून येते. भावी हिंदुस्थान कसा असावा, सध्याची स्थिती बदलली जाऊन सुखाचे रामराज्य हिंदुस्थानात यावे यासाठी समर्थांनी भव्य दिव्य असे स्वप्न पाहिले आहे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यामुळे या स्वप्नाला आधार, आकार मिळेल अशी स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे सत्याधिष्ठित असे हे स्वप्न आहे. त्यामधून राजकारण, राजधर्म, सेवकधर्म, वैराग्य, रामराज्य, युध्दवर्णन हे विचार प्रगट झाले आहेत. त्यानुसार त्याचा विचार मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

श्रीसमर्थांची प्रेरणा, गुरुवर्य डॉ. दा. वि. कुलकर्णींचे अनमोल मार्गदर्शन तसेच मराठी विभाग प्रमुख डॉ. नसिराबादकर यांचे सततचे प्रोत्साहन यामुळे ही प्रबंधिका पूर्णत्वाला जाणार आहे. त्यात मी निमित्तमात्र आहे.

-----